# प्रेस नोट

सायबर पो.स्टे. जळगांव
दि.29/04/2025

## " शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणुक केल्यास मोठया प्रमाणावर लाभ देण्याचे आमीष दाखवुन फसवणुक करणारे आरोपी जळगांव सायबर पोलीसांचे जाळयात. "

*********************************************************

सायबर पो.स्टे. भाग 5 गुरनं 55/2024 BNS 318(4),3(5) सह IT Act कलम 66(d) प्रमाणे दिं.21/08/2024 रोजी दाखल गुन्हयातील तक्रारदार यांना दिनांक 10/06/2024 पासुन ते 31/07/2024 पावेतो फिर्यादी यांना व्हाट्सअप द्वारे अमीत मालविया, आदित्य जैन, विजय कुमार असे नाव सांगणाऱ्या इसमांनी व्हॉट्सअप क्रं 916391720665, 9179732867 8541095647, 8541093435, 9952163862, 7319781225, 8603504255, 8541094055, 8541094969 द्वारे संपर्क करुन आमच्या Raise-Pyramid एलिट प्रकल्प योजनेत सामील होण्यासाठी गुंतवणुक करण्याचे अमिष दाखवुन त्यातील काही सदस्यांची निवड करुन सदर ट्रेडिंग टिकीटे मिळवनु नफा कमवल्या नंतर आम्हाला धर्मदाय अधिक चांगल्या प्रकारे विकसीत करण्यात मदत करण्या साठी गुंतवणुक दारांनी त्यांच्या नफ्यातील 20% रक्कम आमच्या धन सिक्युरिटीज धर्मदाय संस्थेला दान करावे लागेल असे खोटे सांगुन फिर्यादी यांच्या कडुन वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यात एकुन 53,65,000/- येवढी रक्कम ऑनलाईन/RTGS/NEFT द्वारे स्विकारुन कुठल्याही प्रकारची रक्कम परत न करता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन गुन्हा दाखल आहे.

गुन्हयाचे तपासात मा.पोलीस अधीक्षक ,जळगाव, मा.अपर पोलीस अधीक्षक,जळगाव परिमंडळ यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पो.स्टे.चे पोलीस निरीक्षक सतिष गोराडे यांनी व त्यांचे अधिनस्त पोउपनि दिगंबर थोरात यांचे सोबत पोहेकॉ/ दिलीप चिंचोले व पोकॉ हारुण पिंजारी सायबर पो.स्टे.चे तपास पथकाने **कांजीभाई भिकाभाई जादव, वय-42, व्यवसाय-फायनांन्स कंन्सलटन्सी, रा-श्रीनाथजी सोसायटी, ब्लॉक-ई, भुतडाबापा मंदिर गल्ली, डाबोर-2, वेरावल, ता.वेरावल, जिल्हा गिर सोमनाथ, गुजरात यास दिं.29/04/2025 रोजी अटक करण्यात आली आहे**. त्याला मा. न्यायालयाने चार दिवस पोलीस कस्टडि रिमांड दिली आहे. सदर आरोपीने एक एनजीओ तयार त्याचे एक करंट बँक खाते उघडुन त्यामध्ये सायबर फसवणुकीचे पैसे डोनेशनचे बहाण्याने स्विकारुन ती रक्कम समाज कार्यासाठी खर्च केल्याचे कागदोपत्री दाखवित आहे. सदर गुन्हयात आजपावेतो 7 आरोपी निष्पन्न करुन 3 आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात बँक खात्यांचे तांत्रिक विश्लेषन करुन फिर्यादी यांना 11,83,000/- रुपये मिळवुन दिले आहे.

### <u>नागरीकांना जाहीर आवाहन</u>

तरी सायबर पोलीस स्टेशन जळगाव कडून जिल्ह्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणुक केल्यास मोठया प्रमाणावर नफा मिळतो असे आमिष दाखवुन नागरिकांना मोठया प्रमाणावर पैसे गुंतवणुक करण्यास सांगितले जाते त्याबाबत नागरिकांना आव्हाहन करण्यात येते की फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप द्वारे प्राप्त होणारे शेअर ट्रेडिंग गुंतवणुकीचे येणार मॅसेज यांना बळी पडु नये व असे कोणतेही गुंतवणुकीचे ॲप्लीकेशन तसेच वेबसाईट वर आपले खाते रजिस्टर करु नये जर आपली फसवणुक झाल्यास आपण सायबर पोलीस स्टेशन येथे फोन क्रं.0257-2229695 यावर संपर्क करावा. तसेच सायबर फ्रॉड झाल्यास तात्काळ <u>1930 **या टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करावा अथवा** Cybercrime.gov.in</u> यावर ऑनलाईन तक्रार नोंदवावी.


महाराष्ट्र पोलीस